# विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय,
# नगरपालिका शाखा

## जाहीर सुचना

शासन अधिसूचना क्र. वविम-2009/88/प्रकरण 244/09/नवि-23 दिनांक 31.05.2011 संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुरु असलेल्या याचिकेमध्ये दिनांक 08/10/2020 रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यासाठी प्रस्तावित 29 गावांसंदर्भात त्या क्षेत्रातील सर्व घटकांसोबत व्यापक सल्लामसलत करुन तद्नंतर यथोचित अंतिम निर्णय घेण्याचे शासनास आदेश दिले आहेत. त्यानुसार शासनाने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सद्यस्थितीतत कोव्हीड-19 चा प्रार्दुभाव विचारात घेता प्रत्यक्ष सुनावण्या घेणे संयुक्तिक होणार नाही याकरीता प्रस्तुत क्षेत्रातील व्यक्ती/संस्था/लोकप्रतिनिधी इत्यादीनाआपल्या लेखी हरकती /सूचना /निवेदने सादर करण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक असल्यामुळे हरकती /सूचना /निवेदने लेखी स्वरुपात स्विकारण्यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम निश्चित केला आहे व अधिकारी यांना निर्देशित करण्यात येत आहे.

| लेखी सुचना व हरकती दाखल करण्याचा कालावधी | सुचना व हरकती दाखल करण्याची ठिकाणे | संबंधित अधिकारी |
|---|---|---|
| 17 नोव्हेंबर ते 24 नोव्हेंबर 2020 (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत) | उपविभागीय अधिकारी कार्यालय,वसई जि-पालघर | उपविभागीय अधिकारी,वसई |
| | वसई-विरार शहर महानगरपालिका,उपायुक्त यांचे कार्यालय,विरार | उपायुक्त,(सामान्य) वसई विरार शहर महानगरपालिका |
| | निवासी उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय,पालघर | निवासी उपजिल्हाधिकारी,पालघर |
| | प्रादेशिक उपसंचालक यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई. | प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिका प्रशासन, कोकण विभाग. |

तरी या जाहीर सुचनेद्वारे आवाहन करण्यात येते की उक्त कार्यक्रमानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेतुन 29 गावे वगळण्याबाबत संबंधित इच्छुक व्यक्ती /संस्था/ लोकप्रतनिधी इत्यादी यांनी उपरोक्त नमूद ठिकाणी सुट्टीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत लेखी हरकती/सुचना/निवेदने सादर करावी.

(अण्णासाहेब मिसाळ)
विभागीय आयुक्त,कोकण विभाग

Scanned with CamScanner